



RNI NO. MAHMAR/2020/84035

BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ






मंगळवार, १ एप्रिल २०२५ | वर्ष : ५ | अंक : ९६ | दैनिक | किंमत : ₹५/-

Tuesday, 1 April 2025 | Year : 5 | Issue : 96 | Daily | Rate: Rs. 5/-

# भारतातील शिक्षण व्यवस्थेची हत्या थांबवा : सोनिया गांधी

**नवी दिल्ली :** काँग्रेसच्या संसदीय पक्षाच्या अध्यक्षा सोनिया गांधी यांनी देशातील शिक्षण व्यवस्थेच्या स्थितीवरून केंद्र सरकारला धारेवर धरण्याचा प्रयत्न केला आहे. त्या म्हणाल्या, 'गेल्या दशकभरात केंद्र सरकारने इथल्या शिक्षण व्यवस्थेत केवळ स्वतःचा अजेंडा राबवण्याचा प्रयत्न केला आहे. स्वतःच्या फायद्यासाठी शैक्षणिक संस्थांचे खासगीकरण केले आणि लोकांवर खासगी शिक्षण संस्था लादल्या.'

सोनिया गांधी म्हणाल्या, 'भाजपाचे तीन C (सी) इथल्या शिक्षण व्यवस्थेचे नुकसान करत आहेत. केंद्रीकरण, व्यापारीकरण आणि सांप्रदायिकीकरण या तीन सी मुळे विद्यार्थ्यांचे नुकसान होत आहे. या सरकारने गेल्या वर्षभरापासून शिक्षण मंडळाची बैठक बोलावलेली नाही. राष्ट्रीय शिक्षण धोरणाशी संबंधित मोठ्या बदलांबाबत केंद्र सरकारने राज्य सरकारांशी एकदाही चर्चा केलेली नाही. राज्य सरकारांवर दबाव आणणे, केंद्र सरकारचा निधी रोखणे ही सरकारसाठी शरमेची बाब आहे.'



'यूजीसीच्या नियमांचा नवीन मसुदा अलीकडेच सादर केला आहे. त्यामध्ये राज्य सरकारच्या विद्यापीठांमधील कुलगुरूंच्या नियुक्ती प्रक्रियेतून राज्य सरकारे वगळण्यात आली आहेत. यासंदर्भात राज्यपालांमार्फत थेट केंद्र सरकारला अधिकार देण्यात आले आहेत. मोदी सरकारचे हे प्रताप संघराज्यासाठी धोकादायक आहेत. या लोकांनी भारताच्या शिक्षण व्यवस्थेची हत्या थांबवली पाहिजे.

– सोनिया गांधी

### 89,441 शासकीय शाळा बंद

काँग्रेसच्या राज्यसभा खासदार सोनिया गांधी म्हणाल्या, केंद्र सरकारने खासगीकरणाला प्रोत्साहन दिल्याने 2014 पासून आतापर्यंत 10 वर्षांत देशातील 89,441 शासकीय शाळा बंद झाल्या आहेत. त्याजागी 42,944 नव्या खासगी शाळा उभारण्यात आल्या आहेत. त्याचबरोबर एनएएसी व एनटीएसारख्या संस्थांमध्ये भ्रष्टाचार होत असून त्याचा शिक्षण व्यवस्थेवर गंभीर परिणाम होत आहे.

### केंद्र सरकारचा संप्रदायिकीकरणावर भर

**माजी काँग्रेस अध्यक्षा म्हणाल्या, 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ व भाजपाचा वैचारिक अजेंडा पुढे नेण्यासाठी, तो लहान मुलांमध्ये रुजवण्यासाठी केंद्र सरकार संप्रदायिकीकरण करण्यावर भर देत आहे. शालेय अभ्यासक्रमातून महात्मा गांधींची हत्या आणि मुघल कालखंड वगळण्यात आला आहे. शैक्षणिक संस्थांमधील शिक्षक व संचालकांची नियुक्ती करत असताना गुतवत्तेशी तडजोड करून केवळ विचारसरणीला प्राधान्य दिले जात आहे.**

# चंद्रपूर जिल्ह्यात बालविवाहाचा शाप

### पाच वर्षांत 48 बालविवाह

**चंद्रपूर :** बालविवाह प्रतिबंधात्मक अभियान येथे राबविण्यात येत आहे. परंतु, एकट्या मात्र चंद्रपूर जिल्ह्यात मागील पाच वर्षांत 48 बालविवाह झालेत. यातील 41 बालविवाह रोखण्यात यश आले. तर, 7 प्रकरणात गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. त्यामुळे चंद्रपूर जिल्ह्याला बालविवाहाचा शाप लागला काय अशीही चर्चा सुरू आहे. औद्योगिक जिल्हा अशी ओळख असलेल्या चंद्रपूर मध्ये जिवती, कोरपना, पोंभूर्णा हे तीन ग्रामीण तालुके आहेत. शहरी भाग सोडला तर ग्रामीण भागात बालविवाह नित्याने होत असल्याचे दिसून आले आहे.



जिल्ह्यात 2020-21 या वर्षांत 2 बालविवाह झालेत. चंद्रपूर आणि नागभीड तालुक्यात झालेले हे दोन्ही विवाह रोखण्यात प्रशासनाला यश आले असले, तरी या दोन्ही प्रकरणात गुन्हे दाखल करण्यात आले. 2021-22 मध्ये बालविवाहाची संख्या वाढली. पोंभुर्णा, मूल या तालुक्यात प्रत्येकी दोन, तर चंद्रपूर, सावली, वरोरा, जिवती आणि कोरपना तालुक्यात प्रत्येकी एक बालविवाह झाला. 9 बालविवाह रोखण्यात यश आले. मात्र, एकाही प्रकरणात प्रशासनाने गुन्हा दाखल केला नाही. 2022-23 मधील 7 बालविवाहांतील दोन प्रकरणे पोलिस ठाण्यात दाखल झाली. चंद्रपूर तालुका 2, तर बल्लारपूर, मूल, चिमूर, गोंडपिपरी आणि नागभीड तालुक्यात प्रत्येकी एका बालविवाहाची नोंद प्रशासनाकडे आहे. 2023-24 मध्ये तब्बल 12 बालविवाह झालेत. यात चंद्रपूर 4, जिवती 4 आणि बल्लारपूर, मूल, वरोरा आणि राजुरा तालुक्यात प्रत्येकी एक बालविवाह झाला. यातील दोन प्रकरणांत पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तर, 2024-25 मध्ये एकट्या जिवती तालुक्यात पाच बालविवाह झाले आहेत. चंद्रपूर, बल्लारपूर, मूल, पोंभुर्णा, राजुरा आणि नागभीड तालुक्यात प्रत्येकी एक बालविवाह झाला. यातील राजुरा येथील प्रकरण पोलिस ठाण्यात दाखल झाले. एकूण 15 बालविवाह यावर्षात रोखण्यात प्रशासनाला यश आले. जिल्ह्यातील 15 तालुक्यांतील 13 तालुक्यात मागील 5 वर्षांत बालविवाह झाले आहेत. मात्र, भद्रावती आणि सिंदेवाही या दोन तालुक्यात बालविवाहाची एकही घटना घडलेली नाही, ही बाब समाधानकारक आहे. बालविवाहाच्या वाढत्या घटना लक्षात घेऊन उपाययोजना करण्यात येत आहेत. यात 18 वर्षांच्या आतील बालिका शाळेत सतत गैरहजर राहत असतील, तर बालिकांच्या घरी गृहचौकशी करून अनुपस्थितीच्या कारणाची माहिती ग्रामसेवक, जिल्हा बाल संरक्षण कक्ष, जिल्हा महिला व बालविकास कार्यालय तसेच शिक्षण विभागाला द्यावी, अशा सूचना जिल्ह्यातील सर्व शाळांना जिल्हा महिला व बालविकास अधिकारी कार्यालयातर्फे देण्यात आल्या आहेत.

# म्यानमारमधील भूकंपबळींची संख्या दोन हजारांच्यावर

### साडेतीन हजार नागरिक जखमी



**नवी दिल्ली :** म्यानमार व थायलंडमध्ये तीन दिवसांपूर्वी झालेल्या भूकंपाने मोठा विध्वंस केला आहे. या भूकंपाचे केंद्र म्यानमारमध्ये असल्याने या देशात मोठी जीवित व वित्तहानी झाली आहे. शेकडो इमारती कोसळल्या आहेत, हजारो घरे ढासळली आहेत. या भूकंपानंतर बाधित परिसरात बचाव मोहिमा सुरू करण्यात आल्या आहेत. बचाव पथकातील हजारो कर्मचारी व लष्कराचे जवान गेल्या तीन दिवसांपासून ढिगाऱ्याखाली अडकेल्या लोकांना वाचवण्याचा प्रयत्न करत आहेत. आतापर्यंत शेकडो लोकांना त्यांनी डेब्रिजखालून सुखरूप बाहेर काढले आहे. तसेच अनेक मृतदेह देखील बाहेर काढण्यात आले आहेत.

"या भूकंपात 3,400 जण जखमी झाले आहेत. तर 1,644 जण मृत्यूमुखी पडले आहेत. याचबरोबर 300 हून अधिक जण बेपत्ता असून आम्ही त्यांचा शोध घेत आहोत.

– मेजर जनरल जॉ मिन तुन

म्यानमारमधील लष्करी सरकारने सांगितले आहे की या भूकंपात 1,700 नागरिकांचा मृत्यू झाला असून, 3,514 नागरिक जखमी झाले आहेत, तर 150 हून अधिक जण बेपत्ता आहेत. मात्र, तिथल्या स्थानिक प्रसारमाध्यमांनी म्हटले आहे की या भूकंपात 2,028 जणांचा बळी गेला आहे. जखमींची संख्या 3,600 हून अधिक आहे. म्यानमारमधील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वात मोठे शहर असलेल्या मंडालेपासून 17.2 किमी अंतरावर भूकंपाचा केंद्रबिंदू होता. भूकंपाचे लागोपाठ सात हादरे बसले, त्यापैकी 7.7 (रिष्टर स्केल) तीव्रतेचा सर्वात मोठा धक्का होता.

# ईदच्या दिवशी नमाज अदा करण्यापासून रोखल्याचा पोलिसांवर आरोप

**मुरादाबाद :** रमजान ईदच्या निमित्ताने नमाज अदा करण्यासाठी मुस्लिम बांधवांची प्रार्थना स्थळांवर गर्दी होते आहे. दरम्यान उत्तर प्रदेशातल्या मुरादाबादमधला एक व्हिडीओ व्हायरल झाला आहे. नमाज अदा करणाऱ्या लोकांमध्ये आणि पोलिसांमध्ये वाद झाल्याचा हा व्हिडीओ आहे. पोलिसांनी काही लोकांना थांबवल्यानंतर हा वाद सुरु झाला. मुरादाबादमधील ईदगाह (प्रार्थनास्थळ) या ठिकाणी ईदची नमाज अदा करण्यासाठी लोक जमा झाले होते. त्यावेळी या ठिकाणी गर्दी झाली. ज्यानंतर पोलिसांनी काही लोकांना ईदगाहमध्ये जाण्यापासून रोखले. यावेळी गर्दीतले लोक म्हणू लागले आम्ही नमाज अदा करायला



आलो आहोत, वाद घालण्यासाठी नाही. पोलिसांनी लोकांना ईदगाहमध्ये जाण्यापासून रोखले कारण मोठ्याप्रमाणावर गर्दी झाली होती पण त्यावरुनच वाद सुरु झाला असे कळते आहे. ANI ने हा व्हिडीओ पोस्ट केला आहे. या ठिकाणी चांगलाच तणाव निर्माण झाल्याचे पाहण्यास मिळाले. अनेकांनी नारे ए तंबीर अल्ला हो अकबर हे नारेही दिले. आता या ठिकाणी असलेली परिस्थिती नियंत्रणात आली आहे असं पोलिसांनी सांगितले आहे.

मुरादाबाद येथील ईदगाहमध्ये वेळेत जाता आले नाही म्हणून काही मुस्लिम तरुणांनी नाराजी व्यक्त केली. त्यांनी हा आरोप केला की सुरक्षेचे कारण देत पोलिसांनी आम्हाला थांबवले. आम्हाला वेळेत नमाज अदा करण्यासाठी जायचे होते. आम्ही पोलिसांना हे सांगत होतो. पण त्यांनी आम्हाला दुसरीकडे जा असे सांगितले. पोलिसांनीही ही बाब सांगितली. त्यानंतर शेवटी इमामांनी या सगळ्यांना बोलवले आणि पुन्हा एकदा नमाज पठण करुन घेतले. अशीही माहिती समोर आली आहे.

# इराणनी जमिनीखाली उभारले 'मिसाईल सिटी'



**नवी दिल्ली :** इराणने गेल्या आठवड्यात जमिनीखाली उभारलेल्या इमारतीमध्ये ठेवण्यात आलेल्या क्षेपणास्त्रांची साठा जगाला दाखवून दिला आहे. यामध्ये त्यांच्याकडे असलेल्या सर्वात शक्तिशाली शस्त्रांपैकी काही क्षेपणास्त्रे इराणने उघड केली आहेत. दरम्यान इराणच्या या भूमिगत 'मिसाईल सिटी'चा व्हिडीओ समोर आल्यानंर हा एक प्रकारे इस्त्रायल आणि अमेरिका यांना इशारा असल्याचे मानले जात आहे. सशस्त्र दलांचे प्रमुख मेजर जनरल मोहम्मद हुसेन बघेरी आणि आयआरजीसी एरोस्पेस फोर्सचे प्रमुख ब्रिगेडियर जनरल अमीर अली हाजीजादेह हे या 'मिसाईल सिटी'ची पाहणी करतांनाचे व्हिडीओ फुटेज इराणच्या सरकारी वृत्तवाहिन्यांनी प्रसारित केले आहे. या व्हिडीओ फुटेजमध्ये अनेक शक्तिशाली क्षेपणास्त्र दिसून येत आहेत. ज्यामध्ये खैबर शेकान (900 मैल रेंज) हज कासिम (850 मैल), घद्र-एच (1,240 मैल), सेज्जिल (1,550 मैल) आणि इमाद (1,050 मैल) याच्यासह पावेह लँड अटॅक क्रूझ क्षेपणास्त्र यांचा देखील समावेश आहे. ही क्षेपणास्त्रे गेल्या काही दिवसात इस्त्राइलवर करण्यात आलेल्या हल्ल्यांमध्ये वापरण्यात आल्याचे बोलले जाते.

# राजीवनगरची किरण वर्मा न्यायाधीश परीक्षेत राज्यात दहावी

**हिंगणा :** महाराष्ट्र लोकसेवा आयोग (एमपीएससी) आणि जेएमएफसी यांनी घेतलेल्या दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग परीक्षा -2022 चा निकाल घोषीत झाला असून वानाडोंगरी नगरपरिषद अंतर्गत येणाऱ्या राजीवनगर या वसाहतीमध्ये राहणारी किरण संतप्रसाद वर्मा ही महाराष्ट्रात दहावी आलेली आहे. स्क्राफ्टचा व्यवसाय करणाऱ्या संतप्रसाद वर्मा यांची मुलगी किरण ही लवकरच न्यायाधीश बनणार आहे. त्यामुळे किरण आणि तिच्या कुटुंबाचे सर्वत्र कौतुक होत आहे. एकूण 343 उमेदवारांची मुलाखतीसाठी निवड झाली.29 मार्चला शनिवारी अंतिम निकाल जाहीर झाला असून 114 जणांची दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर व न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग या पदासाठी निवड करण्यात आलेली आहे. 114 उमेदवारामध्ये किरण वर्मा हिने दहावा क्रमांक प्राप्त केला आहे. किरण ही सिव्हिल लाइन, नागपूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर लॉ-कॉलेज मधुन कायद्याचे शिक्षण पुर्ण केले. नंतर हिने पुण्यातील गणेश सिरसाट अॅकॅडमीमध्ये प्रवेश घेतला.



('मेरे बेटीको अॅडव्होकेट बनाऊंगा' एकदा काही कामानिमीत्त मी आईबाबासोबत न्यायालयात गेले होतो. तेंव्हा तेथील वकीलांना पाहुन माझे बाबा प्रभावित झाले. व माझ्याकडे पाहुन म्हणाले की, मै भी मेरी बेटीको अॅडव्होकेट बनाऊंगा. माझ्या वडीलांनी फक्त वकील बनवण्याचे स्वप्न पाहीले होते. पण मी आज वकिलांची न्यायाधीश झाले. आणि माझ्या वडिलांचे स्वप्न पुर्ण केले. यशाचे श्रेय तिने आईबाबा व अॅड. गणेश सिरसाट यांना दिले. अशी प्रतिक्रिया किरण वर्मा हिने दिली.) किरणला एक भाऊ आणि दोन बहिणी आहेत. दुसऱ्या क्रमांकाची राधिका ही इंजिनियर असून तिसरी रिंकी ही एमपीएससी परीक्षेची तयारी करीत आहे. किरणचा निकाल जाहीर होताच परिसरातील नागरिकांनी तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव सुरु केला आहे. तसेच वानाडोंगरी नगरपरिषदेचे माजी उपाध्यक्ष कृपाशंकर गुप्ता, माजी पंचायत समिती सदस्या रेखा वर्मा, दिलीप गुप्ता, नंदकिशोर वर्मा, ज्योती पारसकर व चंदन वर्मा यांनी घरी जाऊन अभिनंदन केले.


## भारतीय संविधानाचा 75 वा वर्धापन दिन

## बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे जन्मशताब्दी वर्षे

दैनिक बहुजन सौरभतर्फे बहिष्कृत भारत वर्तमानपत्राच्या वर्धापन दिनानिमित्त

## संवाद मार्च

दि. 3 एप्रिल 2025. सकाळी 7.00 वा. डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान, वैशाली नगर ते जयभीम चौक यादवनगर. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून जयभीम प्रवर्तक लोकप्रिय बाबू हरदास एल. एन. व बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांच्या छायाचित्रांचे अनावरण. दैनिक बहुजन सौरभ हा घरोघरी लावला जावा हा संदेश या निमित्ताने देण्यात येईल.

विशेष सहकार्य : हरदास नगर अर्बन क्रेडिट को ऑपरेटिव्ह सोसायटी लिमिटेड, बाबु हरदास एल.एन. बहुउद्देशिय संस्था यादवनगर.

विनित : जयभीम चौक विकास समिती. सिनिअर सिटीजन. आटो संघटना. डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यान वैशाली नगर. दैनिक बहुजन सौरभ भागधारक व वाचक. समुद्योष सामाजिक संस्था. उद्घोष मैत्री संघ.



“ संकटांचा सामना आत्मविश्वासाने करा, यश आपलेच आहे. ”



## 1 एप्रिल - भारतीय रिजर्व्ह बैंक स्थापना दिवस - डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शोध प्रबंध रुपया पुढील समस्या - उगम व उपाय आधारावर स्थापना

# डॉ. बाबासाहेब महान देशभक्त व अर्थशास्त्रज्ञ

*1923 मधे डॉ. बाबासाहेबांनी शोध प्रबंध THE PROBLEM OF RUPEES : (ITS ORIGIN AND ITS SOLUTION (रुपया पुढील समस्या - उगम व उपाय) लंदन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स ( इंग्लैंड) इथे प्रस्तुत केला. या शोधप्रबंधच्या आधारावर अत्यंत नामांकित व मानांकित यूनिवर्सिटी 'लंदन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्सने' बहु प्रतिष्ठित डिग्री 'D.Sc.(डॉक्टर ऑफ साइंस)' डॉ. बाबासाहेबांना प्रदान केली.*

अर्थशास्त्र या विषयातील जगातील सर्वोच्च समजल्या जाणारी ही पदवी आहे. या ऐतिहासिक घटनेला शंभर (100) वर्ष पूर्ण झालेत. भारतीय रिजर्व्ह बैंकच्या स्थापनेत या प्रबंधाचे महत्व पूर्ण योगदान आहे. 'हिल्टन यंग आयोग'च्या शिफारशी वरून भारतीय रिजर्व्ह बैंकची स्थापना झाली. 1923 मधे ह्या शोध प्रबंधावर 'डॉक्टर ऑफ साइंस' पदवी मिळाल्यावर या हिल्टन यंग आयोगाने साक्ष देण्यासाठी डॉ. बाबासाहेबांना 1925 मधे पाचारण केले व साक्ष नोंदविल्या गेली. या हिल्टन यंग आयेगाने 1926 मधे रिपोर्ट प्रस्तुत केली ज्याच्या आधारावर भारतीय रिजर्व्ह बैंकची स्थापना झाली. यापूर्वी डॉ. बाबासाहेबांनी कोलंबिया (अमेरिका) विद्यापीठातील एम.ए., पी.एच.डी. तसेच लंदन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स विद्यापीठातील एम. एससी. या पदव्या प्राप्त केल्या आहेत.



लक्ष्मण बोरकर
मो. 7709318607

डॉ. बाबासाहेबांचा हा प्रबंध ब्रिटिश राज्यकर्त्यांना हादरा देणारा व त्यांच्या आर्थिक नीतिची, भारता विषयीच्या धोरणाची निंदा करणारा, धज्जिया उडविणारा होता. त्यामुळे ब्रिटिशांनी पदवी देण्यास टाळाटाळ केली, किंबहुना नकार सुद्धा दिला. डॉ. बाबासाहेबांना आपले विचार मागे घ्यायला सांगितले. डॉ. बाबासाहेबांना सत्याशी प्रतारणा करणे विसंगत वाटल्यामुळे आपले विचार मागे घेण्यास ठाम नकार दिला. डॉ. बाबासाहेबांनी कळविले की 'मी जे मुद्दे मांडले आहेत ते पूर्ण अभ्यास करून, तथ्यावर आधारित व भारतीय जनतेच्या भल्याचा विचार करून मांडले आहेत. त्यामुळे त्यात बदल करण्याचा प्रश्नच नाही, डी.एस.सी. पदवी नाही मिळाली तरी चालेल. डॉ. बाबासाहेब फक्त भाषेची तीव्रता/उग्रता सौम्य करायला राजी झालेत परंतु विचार/तथ्य मागे घ्यायला त्यांनी स्पष्ट नकार दिला. सौम्य भाषेतही डॉ. बाबासाहेबांनी ब्रिटिशांना फुलिश, नॉनसेंस सारखे विशेषण दिलेत. प्रबंधात रिसर्च/शोध करून सत्यता व तथ्य समोर आणलेले होते त्यामुळे ब्रिटिश अर्थशास्त्रज्ञांना नाईलाजाने प्रबंध स्वीकारने भाग पडले. डॉ. बाबासाहेब लिहतात की ब्रिटिशांनी आपल्या फायद्यासाठी व अमाप भारतीय संपत्ति इंग्लैंडला नेण्यासाठी चलन व्यवस्थेचा दुरूपयोग केला. इंग्रजांच्या आर्थिक नीति, धोरणाची व चलन व्यवस्थेची कटु व तीव्र आलोचना केली, त्यांना मूर्ख म्हणून संबोधिले, ब्रिटिशांना शासन करण्यास लायकीचे नाहीत, अयोग्य आहात हे खडे बोल सुनविले आणि ही डॉ. बाबासाहेबांची सौम्य केलेली भाषा होती तर मुळ/ओरिजनल भाषा किती तीव्र, उग्र, कटु असेल याची कल्पना येते. ज्यावेळेस हा शोध प्रबंध प्रस्तुत केला (1923 मधे) त्यावेळेस भारतात ब्रिटिशांचे साम्राज्य होते, ब्रिटिशांच्या विरुद्ध शब्द ही काढण्याची हिम्मत होत नव्हती परंतु डॉ. बाबासाहेबांनी हे खडे बोल/वचन सुनविले तेही लंदन मधे जाऊन व वास्तव्य करून. डॉ. बाबासाहेबांचे हे कार्य एखाद्या सिंहाला त्याच्या गुहेत जाऊन हात घालून त्याची आयाळ पकडण्यासारखेच होते यात शंका नाही. ब्रिटिश साम्राज्याच्या विरुद्ध डॉ. बाबासाहेबांचा हा वैचारिक,






बौद्धिक संघर्ष व युद्ध होते तेही 'वन मेन आर्मी' (One Man Army). डॉ. बाबासाहेब प्रबंधात म्हणतात की माझ्या या प्रबंधाचा उद्देश भारतीय चलन व्यवस्थेला स्वतःच्या भक्कम पायावर उभे करने आहे व हा प्रबंध भारताच्या गरीब जनतेचा विचार करून लिहला आहे.

डॉ. बाबासाहेबांनी प्रस्तुत शोध प्रबंधात सन 1800 ते 1893 या कालावधीतिल भारतीय चलन व्यवस्थेचा उहापोह केला आहे. ग्रंथात द्विधातु (चांदी व सोने ) चलन पद्धती, चांदी चलन पद्धती, चांदी प्रमाण चलन पद्धती, सुवर्ण प्रमाण पद्धती, सुवर्ण विनियम प्रमाण पद्धती यांचे तार्कि क विश्लेषण केले आहे.भारत देश आर्थिकदृष्ट्या पुढारलेला देश होता, भारताचा व्यापार संपूर्ण जगभर होता. चलन व्यवस्था तीन इलाख्यात विभागली होती. बंगाल, बॉम्बे व मद्रास. जिलावार वेगवेगळे चलन अस्तित्वात होते व त्या जिल्ह्यातच चलन म्हणून मान्य होते. सत्ता ईस्ट इंडिया कंपनीने बळकावल्यावर त्यांच्या संचालक मंडळाने चलन व्यवस्थेत सुधार करण्याच्या हेतूने भारतात चांदीची नाणी (रुपया) (एक धातु) हे सर्व साधारण चलन म्हणून मान्यता दिली. ईस्ट इंडिया कंपनीचे संचालक मंडळ व तिन्ही (बंगाल, मद्रास व बॉम्बे) इलाखातील सरकारे यांच्यात मतभेद झालेत. सोन्याचे चलन व्यवहारातून काढायाला तिन्ही सरकारे तयार नव्हती, त्यांनी चक्क नकार दिला. परंतु संचालक मंडळ व ब्रिटिश साम्राज्याला चांदीची एक प्रमाण असलेली चलन व्यवस्था (एक धातु) पाहिजे होती व ही व्यवस्था 1835 च्या कायदा ने लागू झाली. भारतातला उद्योग व व्यापार वाढू नये म्हणून ब्रिटिशांनी बराच काळ कर आकारणी व जल वाहतुकीच्या कायदा द्वारे नियंत्रण ठेवले म्हणजे आयाती वर नाममात्र (2.5 टक्के) कर व निर्याती वर उच्चतम कर (50 टक्के ते 500 टक्के पर्यंत) लादुन भारताचा उद्योग व व्यापार डबघाईस आणला. ह्या अन्यायाच्या विरोधात मोठा लढा उभारला शेवटी 1842 मधे कर कायदात सुधारणा करण्यात आली व जल वाहतूक कायदा रद्द करण्यात आला. ह्यानंतर भारतीय उद्योग व व्यापाराला गती मिळाली.

**रुपया पुढील समस्या -**

उगम व उपाय या ग्रंथाला 100 वर्ष पूर्ण झालीत. 1 एप्रिल, 1935 ला या शोध प्रबंधाच्या आधारावर भारतीय रिजर्व्ह बैंकची स्थापना झाली. ■ ■

## ठामपणा

## अनंतायन



ॲड. अनंत खेळकर
मो. 9370061677

राजकारणातील विरोधक त्याला बदनाम करण्यासाठी दररोज खोटेनाटे आरोप करायचे, टिका करायचे. तो त्यांना कधीच उत्तर देत नसे. एके दिवशी त्याचा कार्यकर्ता म्हणाला, 'साहेब! तुम्ही आरोपांचे खंडन का करत नाही? आम्हाला चिड येते पण तुम्ही न रागावता एवढे कसे काय शांत राहाता? त्यावर तो हसत हसत म्हणाला, 'माणसाने स्वतःला कधीही आगपेटीच्या काडीसारखे होऊ देऊ नये. जी थोड्याशा घर्षणाने पेट घेते. स्वतःला एखाद्या शांत सरोवरासारखे बनवावे, ज्यामध्ये कुणी धगधगता निखारा जरी फेकला तरी तो स्वतः विझून जायला हवा. जेव्हा एखादा पक्षी आकाशाकडे झेप घेतो तेव्हा काही जण त्याचेवर दगड भिरकावतात. तरीही तो खाली बघत नाही. तो अजून एवढी उंच भरारी घेतो. दगड त्याचेपर्यंत पोहोचू शकत नाही. सार्वजनिक जीवनात सचोटीने कार्य करतांना विविध अडचणींचा सामना करावा लागतो. संघर्ष करावा लागतो. कुणी तुमची निंदा करेल तर कुणी विरोध करेल. आपल्या ध्येयापासून विचलीत करण्याचा प्रयत्न जर ते करीत असतील तर समजून घ्यावे की आपण योग्य मार्गाने वाटचाल करीत आहोत. तुमचा दृढनिश्चयच तुम्हाला ध्येयापर्यंत पोहचवतो. आपला निर्धार एवढा ठिसुळ नसावा की, कुणाच्या टिकेमुळे तो कोलमडून पडावा. आयुष्यात उतार चढाव तर येतीलच. पण तुम्ही मात्र ठाम राहायला हवे. ज्याचा स्वतःच्या प्रामाणिकपणावर विश्वास असतो त्याला इतर कोणत्याही पुराव्याची आवश्यकता नसते. सबुरी आणि शांतता हे कमकुवतपणाचे लक्षण नाही, तर ही ती शक्ती आहे जी तुम्हाला अधिकाधिक मजबूत बनवते. प्रत्येक गोष्टींचे उत्तर देण्यात जर तुम्ही तुमची शक्ती वाया घालवत असाल तर तर तुम्ही तुमची योग्यता कधीही सिद्ध करू शकत नाही. मौनासारखा दुसरा बुलंद आवाज कुठेही नाही. साहसाचा अर्थ हा नव्हे की मी घाबरत नाही. साहसाचा अर्थ हा आहे की कोणी कितीही भिती दाखवली तरी तुम्ही तुमचे कार्य करणे सोडत नाही. माझे कार्य हाच माझा परिचय आहे. विरोधकांचे कार्य हा त्यांचाही बायोडाटा आहे. जनता मूर्ख नाही, त्यांना कोण कसा आहे हे बरोबर समजते. दुसऱ्याला वाईट म्हणण्याचा त्यालाच अधिकार आहे जो स्वतः चांगला आहे. स्वतःचे आत्मपरीक्षण करण्यासाठी वाघाचे काळीज हवे. दुसऱ्याच्या चुका काढण्यात तर कुणीही तरबेज असतो. माणसाला तटस्थपणे स्वतःकडे बघता आले पाहिजे. जर तुम्ही तुमच्या नजरेत चांगले आहात तर टिकाकारांच्या नजरेचा विचार करू नका, त्यांना तर तुमच्या लाखों चांगल्या कामापेक्षा एका छोट्याशा चुकीचेही भांडवल करता येते. हा माणसाचा स्वभाव आहे की, सजा अन् सल्ला फक्त दुसऱ्यांनाच दिला जातो. जेव्हा एखादी व्यक्ती स्वतःच्या चुकांचा वकील अन् दुसऱ्याच्या चुकांचा न्यायाधिश बनतो तेव्हा त्याने दिलेल्या निर्णयावर कुणीही विश्वास ठेवत नाही. म्हणून माणसाने डोके आणि मन सदैव शांत ठेवले तरच तो मजबूत बनतो. कारण लोखंड जोपर्यंत थंड असते तोपर्यंतच ते मजबूत असते. एकदा का गरम झाले की समोरची व्यक्ती त्याला हवा तसा आकार देऊ शकते. वय असो की मेहनत ते तुम्हाला थकवू शकत नाहीत. ठोकर तुम्हाला पाडू शकत नाही. जर जिंकायची जिद्द असेल तर हारसुद्धा हरवू शकत नाही. हार जीत हा परिणाम आहे. प्रामाणिकपणावर ठाम राहाणे एवढेच आपले काम आहे. ■ ■

# छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा व राजर्षी शाहू महाराज





याशिवाय शाहू महाराज ज्या जागेवर थांबले होते. तिथं रात्रीच्या वेळी लोकमान्य टिळकांच्या चिथावणी वरून काही ब्राम्हण तरूणांनी दगडफेक केली. आग लावून देण्याचा प्रयत्न केला. पुणे शहरात शिवरायांचा पुतळा बसू नये हा ब्राम्हणांचा नारा होता. शाहू महाराजांना शिवाजीबद्दल एवढंच प्रेम असेल तर, तो पुतळा कोल्हापुरात बसवावा. असा ठराव ब्राम्हण सभेत पास झाला. पण भटांचा विरोध न जुमानता शाहु महाराज स्मारक समितीचे अध्यक्ष झाले. कारण छत्रपती शिवरायांचा पुतळा हा जगातला पहिला पुतळा ठरणार होता. म्हणून भांबूर्डा इथल्या छत्रपती शिवाजी महाराज सैनिक शाळेच्या प्रांगणात हा पुतळा उभारण्याचं ठरवलं. निधी जमू लागला. इ.स. 1921 मध्ये शिवरायांच्या पुतळ्याचं पुजन, चौथारा आणि भुमीपुजन झालं. पुतळ्यांचे नकाशे आराखडे चित्र तयार करण्यात आलं. त्यानुसार पुतळे बनावणारे कारागीर शोधले, पण सर्वच कारगीर ब्राह्मण असल्यानं ब्राम्हण सभेनं त्यांना दम भरला होता. त्यातही एक दोघांनी होकार दिला होता. पण त्यातच 6 मे 1922ला शाहू महाराजांचं निधन झालं. मग ग्वाल्हेरचे जिवाजीराव शिंदे समितीचे अध्यक्ष झाले. त्यांनी काही कारागीर बोलवले त्यांना ॲडव्हॉन्सही दिला पण ते पळाले. शेवटी करमरकर नावाच्या एका मुर्तीकाराचा शोध लागला. त्यांनी सर्व काम करुन देण्याची हमी घेतली. पण पुण्यातल्या ब्राम्हणांनी त्यांना खुप त्रास दिला. तेव्हा ते पुणे सोडून मुंबईला गेले आणि जिवाजीराव महाराजांना भेटून त्यांनी काम सुरू केले.

*राजर्षी शाहू महाराजांनी इ.स. 1917 मध्ये पुणे शहरातल्या भांबुर्डा इथं छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा बसविण्याबाबत शिवप्रेमीजनांची बैठक बोलावली होती. या विरोधात पुण्यातल्या ब्राम्हणांनी मोर्चा काढून त्या बैठकीवर दगडफेक केली.*

समितीने करमकरांना सर्व मदत केली. काम सुरू झालं. पण एवढा मोठा पुतळा बनवण्यासाठी लागणाऱ्या भट्ट्या नव्हत्या. म्हणून समितीनं इंग्रज सरकारकडे त्याबाबत मदत मागितली. तेव्हा मुंबईचे इंग्रज गव्हर्नरनं त्यांचं नांव रिचर्डसन् क्रूडस यांनी फांऊड्रीमध्ये सर्व व्यवस्था करून दिली. सुमारे दोन वर्ष हे काम चाललं आणि एकूण 12 तुकड्यामध्ये हा पुतळा पूर्ण झाला. हे सर्व अवजड तुकडे मुंबईहून पुण्याकडे घेवून जाण्याची सोय नव्हती. इंग्रजांची मुंबई पुणे रेल्वे सेवा सुरु झाली होती. इंग्रज शासनानं विशेष मालगाडीची व्यवस्था करुन पुतळा पुण्यास पोहचून देण्याची जबाबदारी ऊचलली. त्यावेळी पुण्यातल्या ब्राम्हणांनी त्या विरोधात इंग्रजांना पत्र लिहलं. शिवाजी महाराजाचा पुतळा पुण्यात बसवणं हा ब्राम्हणांचा अपमान आहे. सरकारनं त्यास मदत करू नये. इंग्रजांनी ब्राम्हणांचं ऐकलं नाही आणि इ. स. 1927 मध्ये पुतळ्याचे सर्व भाग पुण्यात पोहचले. कडवट भटांनी मुंबई पुणे गाडीही तीन ठिकाणी अडवण्याचा प्रयत्न केला होता. ते सर्व भाग जोडण्याचं साहित्य नव्हतं. ते आणलं, सतत सात महिने काम सुरू होतं. चोवीस तास मराठा, बहुजन, दलित, शिवप्रेमी तरुणांचा खडा पहारा होता. इंग्रज आणि पोलिसांचं पूर्ण सहकार्य होतं. तरीही ब्राम्हणांचा त्रास सुरूच होता. त्यांनी लोहार, जोडारी यांना खूप त्रास दिला. त्याच दरम्यान पुतळा अनावरणासाठी समितीनं इंग्लंडच्या राजपुत्रास पाचारण केलं. त्यांनी येण्याची तयारी दर्शवली तेव्हा याच बाह्मणांनी त्यांना तार करून कळवलं. कार्यक्रमास येवू नये. मोर्च काढले, निवेदनं दिली, दंगली घडवल्या पण इंग्रज मागे हटायला तयार नव्हते. अनावरणाची तारीख ठरली. राजपुत्र मुंबईला उतरून पुण्यास येणार असं ठरलं. भटांनी मुंबईला जाऊन त्यांना काळे झेंडे दाखवले. कार्यक्रम रद्द करावा म्हणून निवेदन दिले. पण राजपुत्रानं ते फेटाळून लावलं. तरी पुण्यातल्या कडवे ब्राम्हण हरले अथवा सरले नाहीत, त्यांनी प्रत्येक ब्राम्हणांच्या घरावर काळे झेंडे लावले आणि राजपुत्र ज्या रस्त्यानं येणार आहेत, त्या रस्त्यावर काळ्या रांगोळ्या काढल्या. पुणे नगरपालिका पूर्णपणे ब्राम्हणांच्या ताब्यात होती. त्यामुळे सर्व ब्राम्हण नगरसेवक आणि नगराध्यक्ष एक झाले त्यांनी स्वखर्चानं ठिकठिकांनी रांगोळ्या निषेध फलक लावले. शिवाय पुणे शहरात बंद जाहिर केला म्हणजे बाहेरून येणाऱ्या शिवप्रेमीची तारांबळ झाली पाहिजे, पाणीपुरवठा ही दोन दिवस बंद ठेवला. हॉटेलही बंद ठेवले आणि हॉटेल मालकांनी कोणालाही पाणी पाजु नये असा दम भरला. इंग्रज सरकार असुनही ब्राम्हणांनी त्यांना जुमानले नाही. समारंभात शिवरायांच्या पुतळ्याखाली बॉम्बस्फोट घडवून आणण्याचे प्रयत्न झाले. पण जागरूक बहूजन मराठा शिवप्रेमींमुळे ते शक्य झाले नाही.

शेवटी दि, 16 जून 1028 रोजी छत्रपती शिवरायांचा जगातील पहिला पुतळा भांबुर्डा म्हणजे शिवाजीनगर इथं संपन्न झाला. ब्रिटनचे राजपुत्र सर लेस्ली विल्सन यांच्या शुभहस्ते आणि महाराज जीवाजीराजे शिंदे यांचे अध्यक्षतेखाली हा समारंभ पार पडला. ग्रामिण भागातून महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश, मध्यप्रदेश येथून हजारो शिवप्रेमी या समारंभात सहभागी झाले होते. याशिवाय देशभरातून सुमारे 565 प्रतिनिधी उपस्थीत होते. अन्नपाण्याविना सर्वाचे हाल झाले. संस्थेनं उपाययोजना केली होती पण ती अपुरी पडली. इंग्रजांच्या काळातली इ. स. 1928 ची ही घटना आहे. मग विचार करा पेशवाईच्या काळात हे ब्राम्हण किती माजली असतील. ज्या क्रूर ब्राम्हणांनी हा प्रकार केला त्यांचेच वंशज आज शिवभक्त शिवशाहीर झालेत. ही घटना प्रत्यक्ष पाहिलेले अनेक मराठे आज जिवंत आहेत. पण खाजगीत उघडलेले तोंड ते दरबारात बंद करतात. सत्य असे दडपलं जातं. म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, जो आपला इतिहास विसरतात ते स्वतःचा इतिहास लिहू शकत नाहीत...!!

■ ■ - समाजमाध्यम

**मोबाईल हातात आल्यापासून अनेक बाबींवर त्याचा प्रभाव पडला. भाषेवर तो जास्त पडला. निकनेम (टोपण नाव) ने नाव नोंदून घेण्याकडे कल वाढला. कारण ही नाव मोबाईल हाताळणाऱ्या पुरती मर्यादित राहतात.**

# आईच नामकरण

या टोपण नावाची मात्र मोठी गंमत आहे. यात पाल्यांनी आपल्या पालकांचेही नामकरण केल्याच जाणवते.शैक्षणिक क्षेत्रात त्याचा प्रभाव असा पडला की विशेषतः इंग्रजीचे शब्द 'शॉर्ट कट' लिहिण्याची वृत्ती बळावली. जसे इंग्रजीतील 'the' शब्द 'त्र' असा लिहिला जातो. 'you' च्याऐवजी फक्त 'u', पत्राच्या शेवटी 'your's 'हा शब्द 'ur's असा मुले उत्तर पत्रिकेत लिहत असल्याचे शिक्षक सांगतात. अर्थात आपल्या भाषेवर त्याचा प्रभाव कळत न कळत पडत चालला आहे हे मान्य करावे लागेल. पाल्यांनी आपल्या आईच नामकरण कोणत्या नावाने केले असेल ही उत्सुकता मला निर्माण झाली ती माझ्या मुलीच्या फोन मध्ये तिने आईचा नंबर ज्या नावाने नमूद केला त्यावरून. एरवी आई बाबतची भावना कवींनी टिपली आहे आणि ती सार्वत्रिकही आहे.

***आई एक नाव असते, घरातल्या घरात गजबजलेले गाव असते!***
***आई असते जन्माची शिदोरी सरतही नाही, उरतही नाही!***
(फ. मुं. शिंदे)

एक कवी आई बाबत लिहितो...

आधीच नव्हते काही
त्यात सोडून गेली आई..

वैभव जोशी यांच्या आईवरच्या कवितेतील ओळी अश्या..

आयुष्याला घाबरण्याचा
स्वभाव नाही आई
तुझ्यावीणा पण जगावयाचा
सराव नाही आई..




प्रत्येक मुलाची आई बाबत भावना कमी जास्त प्रमाणात अशीच असते. आई ही आपले गुपित सांगण्याचे ठिकाण असते. अश्रूंना वाट मोकळी करून देण्यासाठी आधार असते. खर्चासाठी बँक असते. लाड पुरवण्यासाठी हक्काचे ठिकाण असते. कितीही विशेषण वापरली तरी आईची महती संपणार नाहीच.माझी मुलगी अस्मिता आठव्या वर्गात असेल तेव्हा तिच्या शिकवणी वर्गाची सहल जवळपास जायची निश्चित झाली होती. मुलींची चर्चा सुरू होती. मुलीची एक मैत्रीण म्हणाली 'वो सब ठीक है, पहले मुझे राजमातासे परमिशन लेनी पडेगी!' अर्थात इथे राजमाता म्हणजे आई. मला मोठी गंमत वाटली. एकदा मुलीच्या फोनवर तिच्या आईने फोन केला. नाव बघून मी शॉक. 'आई सरकार' नावाने तिने नोंद केली आहे. नंतर भाचा करण, भाची श्रृती यांचे फोन बघितले तर सर्वांनी नामकरण आपल्या अनुभवानुसार केले होते. जसे, मदर टेरेसा, सुप्रिम कोर्ट, मॉम, मम्मी, कदाचित ज्या घरात आई वडील आहेत तिथे हायकोर्ट म्हणून नोंदी केल्या आहेत असे त्यांच्याशी चर्चा केल्यावर जाणवले. फक्त 'आई' मात्र अपवादाने असेल.खरतर या टोपण नावामागे आईचा अनादर व्हावा असा भाग नाही. आईवरच्या हक्काच एक प्रतिक म्हणता येईल. शिवाय देशांतर्गत ज्या संस्था आणि व्यक्ती कार्य करतात त्यांचे व्यवस्थेतील स्थान या टोपण नावात अधोरेखित होत. त्याच बरोबर आईच्या स्वभावाची आणि घरातील स्थानाची ओळखही होते.बापाची नोंद कोणत्या टोपण नावाने केली असेल याची उत्सुकता मला लागून होती. यात काही फारसे ऑप्शन कदाचित नसावेत. म्हणून 'विपक्ष' आणि 'हिटलर' ही दोन टोपण नाव प्रामुख्याने लक्षात आलीत. नव्या पिढीचा जगण्याकडे, नात्यांकडे बघण्याचा दृष्टिकोन जुन्या पिढीच्या दृष्टिकोनापेक्षा भिन्न नक्कीच आहे. नात्यातील मर्म त्यांच्या परीने जाणून घेऊन ते व्यवहार करत आहेत. यातही आपण समाधान मानले पाहिजे. असो, तुम्ही तुमच्या पाल्याने तुमचे कोणत्या टोपण नावाने मोबाईल मध्ये नामकरण केले ते बघाच! एखाद नवीन नाव गवसू शकते! ■ ■



अनिरुद्ध कांबळे
मो. 9922959770

## खंडाळ्याच्या हॉटेलचा किस्सा

# आपले डॉ. बाबासाहेब जेवायला आलेत तुमचे माझे भाग्य समजा!

सन 1942. मुंबई-पुणे हायवेवर निसर्गरम्य वातावरणात वसलेले त्याकाळातील सुप्रसिद्ध खंडाळा हॉटेल. श्रीमंती थाटमाटातले उंची हॉटेल म्हणून त्याची गणना होत असे. हॉटेल उंचशा टेकडीवर बांधण्यात आलेले होते. त्याच्या सभोवताली घनदाट झाडी. उत्तर बाजूला ऐतिहासिक राजमाची किल्ला, त्याच्या खालच्या दिशेला काचळदरी, दक्षिणेला नागफणी भोवताली सह्याद्रीची गिरीशिखरे. पारशीबाबाचे हे हॉटेल तिथल्या रुचकर जेवणासाठी प्रसिद्ध होते. पारशी पद्धतीची मटन बिर्याणी, हैद्राबादी बिर्याणी हे या हॉटेलचे वैशिष्ट्य होते.

नोव्हेंबरमधल्या कडाक्याच्या थंडीने आणि दाट धुक्याने सारा खंडाळा परिसर गारठला होता. थंडीच्या दिवसात हॉटेलात वर्दळ कमीच होती. बाहेरचे जेवणाचे दालन रात्री नऊलाच बंद होत असे. त्या दिवशी ही भटारखाना बंद करून सारे नौकर घरी जाण्याच्या तयारीत होते. त्याचवेळी एक काळ्या रंगाची डॉज गाडी हॉटेलच्या आवारात शिरली. त्यातून एक सूटाबुटातले गृहस्थ उतरले. हॉटेलमधली सामसूम त्यांना जाणवली. तरी ते काऊन्टरपर्यंत गेले. काऊन्टरवर असलेल्या मॅनेजरला त्यानी विचारले, 'एक्सक्यूज मी.'

बी.एन.साळवे

'येस सर, मी रामचंद्र कांबळे.'

'ओ. के. मि. कांबळे. आम्ही पाच जण आहोत आम्हाला डिनर हवय.'

तसे हातातले काम थांबवत रामचंद्र म्हणाले, 'थंडीच्या दिवसामुळे भटारखाना आताच बंद केला आहे साहेब. तुमच्यासारख्या अतिथींची सेवा करण्याची या हॉटेलची खासियत आहे. पण.. पण इलाज नाही. सगळे नौकर घरी निघालेत.' त्या गृहस्थाने सहज सांगितले, 'कांबळेजी माझे नाव आर. आर. भोळे आणि इथे जेवायला आले आहेत ते भारताचे मजूरमंत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर. तेंव्हा प्रयत्न करून बघा.'



डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे नाव कानावर पडताच रामचंद्र कांबळेना आश्चर्याचा सुखद धक्काच बसला. त्यांनी भोळेशी हस्तांदोलन केले. ते म्हणाले, 'साहेब सोय झालीच म्हणून समजा. आमचे भाग्य थोर म्हणून हा योग आलाय. अहो, देवाकडे मागूनही असे भाग्य आमच्या वाट्याला आले नसते. साहेब हे सारे हॉटेल आपल्या सेवेसाठी आहे. इथे काम करणारी बहुसंख्य मंडळी आपल्याच बिरादरीतील आहेत. मी आताच खानसाम्याला जेवण बनवायला सांगतो. तुम्ही बाबासाहेबाना घेऊन या.' रामचंद्रच्या आनंदाला पारावारच उरला नाही. त्यानी ताबडतोब साऱ्या नौकरांना बोलावून घेतले. सांगितले, 'आरं बाबांनो, आपले बाबासाहेब आंबेडकर जेवायला आलेत, तुमचं माझं भाग्य समजा. त्यांची सेवा करायची संधी आपल्याला मिळालीय. असा दिवस आयुष्यात पुनः येणार नाही. घरी जायला कितीही उशीर होऊ द्या, जेवणात कसलीही कसर राहू देऊ नका.'

सगळेजण झाडून कामाला लागले. ऑर्डर पेक्षाही अधिक पदार्थ बनवले गेले.

डॉ. बाबासाहेबांचे उत्तुंग व्यक्तिमत्त्व, चेहऱ्यावर बुद्धिमत्तेची चमक, सूटाबुटातला रूबाबदार पेहराव, डोळ्यात विलक्षण तेज, त्या तेजाने कुणीही दिपून जावे. डॉ. बाबासाहेबांचे दर्शन होताच साऱ्यांनी मनोभावे हात जोडले, चरणस्पर्श करण्यासाठी खाली वाकणार तोच मागे सरकत डॉ. बाबासाहेब म्हणाले, 'अरे थांबा, मी काय देव आहे पाया पडायला! या, असे माझ्या जवळ या! तुम्ही माझेच आहात. मी तुमचाच आहे.'

डॉ. बाबासाहेबांनी जेवण केले. स्वादिष्ट भोजनाने ते तृप्त झाले. त्यांनी सर्वाना धन्यवाद दिले. जेवणानंतर भोळेनी बिल देऊ केले. तसे रामचंद्र आणि भागुजीबुवा हॉटेल मालकाकडे गेले. त्यांनी हॉटेल मालकाला हात जोडून विनंती केली, 'जेवायला आलेले आम्हा दीन दुबळ्यांचे पालनकर्ते आहेत. झालेले बील आम्हा सर्वांच्या पगारातून वळते करून घ्या.' हॉटेल मालकाने डॉ. बाबासाहेबांचे नाव ऐकले होतेच. तो डॉ. बाबासाहेबांना भेटायला आला. त्यानेही बील घ्यायला नकार दिला. तुमच्यासारख्या महान हस्तीचे पाय माझ्या हॉटेलला लागले हे माझे भाग्य समजतो मी. सर्वानी डॉ. बाबासाहेबाचे परत एकदा दर्शन घेतले अन् डॉ. बाबासाहेबांची गाडी मुंबईच्या दिशेने धावू लागली. ■ ■

# हिंदूंनो सावधान!

'हिरवे वादळ, काळ्या सह्याद्रीची छाती करुन आपल्याला थोपवून परतवून लावायलाच हवंय. छातीची ढाल, एका हातात शस्र आणखी दुसऱ्या हातात भगवा धरूनच आता सामोरे जायची वेळ आली आहे. घराघरांतून, मनामनातून, आणखी प्रत्येक मनगटातून हिंदूत्वाची ताकद दाखवायची वेळ आली आहे,' असे आव्हान गुढीपाडवा व हिंदू नव वर्षानिमीत्त आयोजित 'दुर्गा शक्ती (महिलांची) बाईक रॅली' काढण्यात येणाऱ्या भव्य शोभायात्रेच्या प्रसीध्द पत्रकात, वीनित- मा. आमदार संदीप जोशी, अध्यक्ष सिध्दी वीनायक सेवा ट्रस्ट यांनी प्रसीध्द केले. या आव्हानाचे गांभीर्य लक्षांत आले म्हणून हा लेख प्रपंच.

1) हिरवे वादळ म्हणजे नेमके काय? आणि होय, हे हिरवे वादळ हिंदू धर्मावर खरेच घोंघावतय काय? आणि या हिरव्या वादळात अभीप्रेत हिरवा धर्म आहे कि त्या हिरव्या धर्माला मानणारे त्यांचे हिरवे अनुयायी निशान्यावर आहेत ते कां हे समजले पाहीजेत. जर हे वादळ हिरव्या धर्माचे असेल तर मा. आमदार महोदयांकडून त्या धर्माचे धर्मग्रंथातील 'रीडल्स' हिरव्या जनतेसमोर आणून प्रबोधन करण्याचा मार्ग कां पत्करल्या जात नाही, कि जेणेकरुन हिरव्या अनुयायांची त्या रीडल्स मधून सुटका व्हावी? कि हिंदू धर्मातील रीडल्सच त्यांचे मार्गात असे करू नये म्हणून अवरोध नीर्माण करीत आहेत? छातीची ढाल करून व हातात शस्र घेवून अशा धार्मीक रीडल्सची वादळे शमतात का? हिंदूंना असा शस्त्र घेण्याचा इशारा हा उलट पक्षी प्रतीपक्षांस प्रतीकार करण्यासाठी शस्र सज्ज होण्याचा इशारा देणे ठरत नसतो काय? द्वेषाग्नीने पेटत असलेल्या मनाला परीणामाची जाणीव नसते व शेवटी या आगेत पक्ष व प्रतीपक्षातील अनुयायांची राख रांगोळी व होळी होते, कुटूंबेच्या कुटूंबे उध्वस्त होतात, ऊरते ती फक्त राख जी अंगावर लेवून स्मशान जीवण जगण्याची पाळी येते. तेव्हा मदतीला कोणी जवळपास सुध्दा भटकत नाही. पोळी शेकल्या जाते ती चीथावणी खोरांची ज्यांना या आगीची किंचीत ही झळ पोचलेली नसते कारण हे दुसऱ्यांना चीथावणी देवून स्वतः नामानिराळे राहतात. म्हणून अशा चीथावणी पासून हिंदू धर्मीय बहुजनांनी पूर्ण सावधान असावे व स्वतः सुरक्षीत रहावे.




भास्कर खोब्रागडे
मो. 9029225337

2) हिरवे वादळ खरेच हिंदूवर घोंघावतेय काय? याचा खरेच गांभीर्याने वीचार करण्याची आज वेळ आली आहे. खालील प्रश्नांवर उन काही आकलन होते काय ते पाहू.

अ) हिरव्या वादळाच्या अनुयायांनी हिंदूवर अन्याय व अत्याचारांची धूळवड उडाल्याचे आढळत आहे काय कि जेव्हा भारतातील शासन प्रशासन, न्याय व्यवस्था व सुरक्षा यंत्रणा हिंदूच्या हाती एकवटली आहे? यांस हिंदूमध्ये भय निर्माण करण्याचा प्रयत्न समजावा कि चीथावणी देण्याचा समजावा? ब) हिरवे वादळ हिंदूंना अस्पृश्य समजतात काय किंवा हिंदूचा प्रवेश त्यांचे गावांत परीसरात ते वर्ज्य करतात काय? क) हिरव्या वादळाचे हिरव्या अनुयायांनी हिंदूवर कधी बहिष्कार टाकला काय जसे हिंदूच हिंदू- अस्पृषावर बहीष्कार घालतात. ड) हिरव्या वादळाने हिंदूंच्या व्यवसायावर व रोजी रोटी वर जातीनिहाय बंधने आणतात काय? इ) हिरव्या वादळाचे वाहक हिरवे अनुयायी हिंदूचा स्पर्ष अथवा सावली अपवीत्र समजतात काय? ते हिंदूना पीण्याचे पाण्याचे तलावांस, विहीरीस अथवा भांड्यास स्पर्श करण्यास मज्जाव करतात काय? ई) हिरव्या वादळाचे हिरवे अनुयायी हिंदूच्या विवाह प्रसंगी घोड्यावर बसून मिरवणूक काढण्यास किंवा हिंदूना दाढी मिशा ठेवण्यास कधी मज्जाव करतात काय? फ) हिरव्या वादळाने हिंदूच्या तथाकथीत हिंदू धर्म ग्रंथांची व हिंदू देवदेवतेची वीटंबना केली काय किंवा आजही त्यावर नको ती टीका टीपण्णी करतात काय? र) हिंदूच्या हिंदू मंदीरापुढे हिरव्या वादळाचे अनुयायी त्यांचे धार्मीक उत्सवानिमीत्त येवून मंदीरासमोर ढोलताशा वाजवतात किंवा चीथावणीखोर नारेबाजी करून हिंदूच्या प्रार्थनेत व्यत्यय निर्माण करतात, असे कधी होत असते काय किंवा तसे केल्याचा इतिहास तरी आहे काय? ल) हिरव्या वादळाचे हिरव्या अनुयायांनी हिंदूच्या धार्मिक उत्सवास कधी विरोध केला काय? सार्वजनीक जागेवर होणाऱ्या हिंदूच्या सामुहीक प्रार्थनेस, भजन किर्तनांस त्यांनी मज्जाव केला काय जसे त्यांचे आळवण्यावर हिंदूकडून आक्षेप घेतल्या जातो?

ल) हिरव्या वादळाचे हिरव्या अनुयायांचे सकाळच्या प्रहरी होणाऱ्या ध्वनीक्षेपावरील ईश्वर आळवणीस जसे हिंदू आक्षेप घेतात तसा आक्षेप हिरव्या अनुयायांनी मंदीरावरील ध्वनीक्षपावरुन होणाऱ्या अनेक सप्ताहपोटीच्या भजन किर्तनात, प्रार्थनांस कधी आक्षेप घेतला काय? असे इतर अनेक प्रश्न आहेत ज्यांची उत्तरे नकारार्थीच मीळेल. मग हे हिरवे वादळ नेमके काय बला आहे बरे? असो, ते नेमके संदीप जोशीच जाणोत.

3)केसरी वादळापासून सावध व्हा. हिंदूनो व हिंदू बहुजनांनो सावध व्हा, तुम्हास भगवे वादळाचे नावाने उत्तेजीत करून केसरी वादळात गुंडाळल्या जात आहे. ज्या केसरी वादळाचे ज्येष्ठ, श्रेष्ठ व महान नेत्यांनी व तथाकथीत योध्यांनी ज्या हिरव्या वादळाचे अनुयायांना आपले जावई, बहीण जावई करून घेतले आहे तेच आज 'लव्ह जीहाद'च्या नावे द्वेषाग्णी पेटवताहेत. केसरी वादळाचे व केसरी धर्माचे त्यामुळे काही बिघडत नाही परंतू भगवा धर्मावर वादळ घोंघावत असल्याचा कल्लोळ सुरु झाला आहे. या पासून सर्व हिंदू व हिंदू बहूजनांनी सावध व्हावे, शांतता बाळगावी, स्वतःचा संसार उध्वस्त होणार नाही याची काळजी घ्यावी. एका घरांस आग लावून त्यावर केरोसीन ओतून राख करण्याच्या प्रयत्नात त्या आगीच्या ज्वाळा शेजारच्या घराला केव्हा घेरेल व अख्खे गाव केव्हा भस्म होईल हे कळणार सुध्दा नाही. याची देही याची डोळा असे भविष्य पाहण्याची वेळ स्वतःवर येवू देवू नका. ■ ■

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेल्या मार्गावर चालल्यास आपले जीवन उन्नत होऊ शकते : डॉ. रुपा बोधी

# डॉ. रुपा बोधी जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित




**नागपूर :** आंबेडकरवादी महिला संघ ग्रूप तसेच आंबेडकराईट वूमन्स हेल्प ग्रूपतर्फे जागतिक महिला दिवस तसेच महाड संगर दिवसाचे औचित्य साधून वैचारीक कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमात जेष्ठ आंबेडकरी विचारक, विदर्भ मोलकरीण संघटनेच्या नेत्या, सामाजिक कार्यकर्ता रूपा बोधी यांना जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित केले. यासोबतच सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या डॉ. भुवनेश्वरी मेहरे, डॉ. शांता गवई तसेच साहित्यिक सुजाता लोखंडे यांनाही सन्मानित केले. तीनही सन्मानित वक्त्यांनी प्रबोधनात्मक मार्गदर्शक केले.

या कार्यक्रमाच्या अध्यक्ष डॉ. पुनम ढाले म्हणाल्या, मानवी मूल्य प्रस्थापित करण्यासाठी महाडचा सत्याग्रह झाला. संपूर्ण जगात स्त्रीला दुय्यम वागणूक मिळत असली तरी बौद्ध धम्मामध्ये स्त्रीला समानतेची वागणूक मिळत असते हेच समानतेच क्रांतीसूत्र डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानात सम्मिलित केले आहे. प्रमुख वक्ता डॉ. धनराज डहाट म्हणाले, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांशिवाय मानवमुक्तीला पर्याय नाही. संपूर्ण मानवमुक्तीचा मार्ग हा बुद्ध तत्वज्ञान आणि भारतीय संविधानात सहभागी आहे. स्त्री रोगतज्ञ डॉ. दिप्ती किरतकर यांनी स्त्रीयांच्या मनोवृत्तिची मानसशास्त्रीय चिकित्सा केली.

सुरूवातीला सामूहिक बुद्धवंदना झाली. त्यानंतर संविधान प्रास्ताविकेचे वाचन ॲड. सुमित्रा निकोसे यांनी केले. प्रास्ताविक उज्वला गणवीर यांनी केले. पाहुण्यांचा परिचय प्रज्ञा बाली, जयश्री गणवीर, सविता धामगाये, प्रतिभा सहारे, डॉ. योगिता बनसोड तसेच अनिता बनकर यांनी दिला. संचालन सरिता सातारडे यांनी तर आभार प्रदर्शन दीपाली दीप यांनी केले. गायत्री नारनवरे, तक्षशिला वाघधरे, छाया खोब्रागडे, रंजना वासे, भारती सहारे, इत्यादी अनेक मान्यवर उपस्थित होते.

> समाजात जे बदल घडून येतात ते कृतीतून घडून येतात. सामाजिक ओढ असली की त्यातून सामाजिक परिवर्तन घडून येत असते. तथागत बुद्ध तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी सांगितलेल्या मार्गावर चालल्यास आपले जीवन उन्नत होऊ शकते.
> - डॉ. रूपा कुलकर्णी बोधी

## खेड्यातील मेहनती व कष्टाळू विद्यार्थ्यांना नीटद्वारे जी.एम.सी. व एम्समध्ये पाठविणार : डॉ. शुभम इंगळे




**नागपूर :** खेड्यातील विद्यार्थ्यांमध्ये असलेली चिकाटी सातत्यपणा व मेहनत या आधारावर त्यांना अथक परिश्रम घेऊन, नीट परीक्षेद्वारे जी. एम. सी. व एम्स मध्ये पाठविणार आहे, असे डॉ. शुभम इंगळे यांनी सांगितले. संडे धम्म मिशन अंतर्गत मोफत स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन आयोजित केले होते. यावेळी माजी सनदी अधिकारी किशोर गजभिये आयएएस (रिटायर्ड) यांनी स्पर्धा परीक्षा उत्तीर्ण करण्यासाठी जनरल स्टडी या विषयाची डिस्क्रिप्टिव्ह उत्तरे कशाप्रकारे लिहावे तसेच जीवनातील ध्येय गाठण्यासाठी स्पर्धा परीक्षा महत्त्वाची ठरेल असे मत व्यक्त केले. तज्ञ मार्गदर्शक यूपीएससी व एमपीएससी जीएस मेंटर प्रा. विनोद बागडे संचालक मिशन ऑफिसर, नागपूर यांनी विद्यार्थ्यांमध्ये सुप्त गुणांना वाव देण्याकरिता नियोजन तसेच सातत्यपणा व जीवनातील ध्येय समोर ठेवून यशस्वीतेचा क्रम गाठावा असे मार्गदर्शन केले. यावेळी कार्यक्रमाचे प्रस्तावना व उद्घाटनपर मार्गदर्शन डॉ. विजया मुळे तर संचालन सुरेश भिवगडे यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रा. पंकज वाघमारे हे होते. भारतीय संविधान लागू व्हायला व्हायला 75 वर्षे पूर्ण झाले, यावेळी संडे धम्म मिशन अंतर्गत भारतीय संविधान स्पर्धा परीक्षा घेण्यात आली. त्यावेळी मान्यवरांच्या हस्ते विद्यार्थ्यांना बक्षीस देण्यात आले. या कार्यक्रमांमध्ये प्रमुख उपस्थिती साहेबराव भगत, भीमराव मनोहर, नारायण पाटील, विष्णुपंत नाखले, अनिल खैरकर, प्रकाश मनवर, पंजाबराव कांबळे, डॉ. अनिल दहाट, प्रा. प्रवीण काळे, राजकुमार सोनटक्के, सुजित सोनटक्के व प्रवीण काळे उपस्थित होते. आर्वीतून जनतानगर डॉ. बाबासाहेब आंबेडकर वार्ड संजयनगर येथून मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.




**धम्मेक बुद्ध विहार**

44, डांगे ले आउट, प्रबुद्ध कॉलोनी, गजाननननगर, नागपूर 440034 विहारात दर रविवारला उपासक विहारात येतात, धम्मदेसना तसेच विपश्यना शिकविली जाते. विहार चळवळीचे केंद्र व्हावे यासाठी वाटचाल चालू आहे. प्रत्येक महापुरुषांच्या जयंती आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार पेरले जात आहेत.

संवाद मित्र कुसन लिंगायत
मो.नं. 9730242982

## महत्वाचे

### जागतिक रंगभूमी दिन साजरा



**नागपूर :** कृती थिएटर आणि निओक्लास्ट थिएटर यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक रंगभूमी दिनानिमित्त कार्यक्रम साजरा करण्यात आला. यात नाट्य वाचन, एकपात्री प्रयोग, गीत गायन, काव्य वाचन ईत्यादी विविध प्रकारचे कार्यक्रम सादर करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष सिनेनट, जेष्ठ रंगकर्मी अशोक गवळी, कार्यक्रमाचे आयोजन शितल दोडके, प्रमुख अतिथी दिवाकर शिर्के, संचालन रोशन खोब्रागडे, आभार प्रदर्शन प्रिती तिरपुडे. यात भाग घेणारे कलावंत निखिल दांडेकर, अंकिता रामटेके, निकेतन सहारे, संजय सायरे, पम्मी सायरे, निर्वाणी चौधरी, स्वप्निल बनसोड, अनवर शेख, अश्विन नाईक, प्रभात धेटे, आशिष मेश्राम, सुनिता रामटेके, अशोक वाचनेकर, उषा वाचनेकर, आदित्य कापसे, रितीक शामकुवर, इशांत धेटे, अशोक माटे, नितल दोडके, सुनिता दोडके, सुरज चव्हाण, रिया देशभ्रतार इत्यादी कलाकारांनी भाग घेवून कार्यक्रमाची रंगत द्विगुणीत केली.

### व्ही.पी. पाटील यांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार प्रदान



**नागपूर :** व्ही.पी. पाटील सेवानिवृत्त शिक्षणाधिकारी यवतमाळ यांच्या 'शब्द. शब्द बुद्ध' या कविता संग्रहास आंबेडकरवादी साहित्य महामंडळ नागपूर यांचे मार्फत उत्कृष्ट काव्यसंग्रह म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर राज्यस्तरीय पुरस्कार मधुरम सभागृह नागपूर येथे या संस्थेचे अध्यक्ष डॉ. दीपककुमार खोब्रागडे यांचे उपस्थितीत डॉ. राजेश गायकवाड सदस्य महाराष्ट्र राज्य साहित्य व संस्कृती मंडळ मुंबई यांचे हस्ते व्ही. पी. पाटील आणि त्यांची सहचारिणी विजया पाटील यांना प्रदान करण्यात आला. या सत्कार समारंभाला उद्घाटक डॉ. प्रकाश करमाडकर कुलगुरू आर्यवृत्त आंतरराष्ट्रीय विद्यापीठ त्रिपुरा, डॉ. जगन कराडे समाजशास्त्र विभाग प्रमुख शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, डॉ. विद्याधर बन्सोड सुप्रसिद्ध साहित्यिक व विचारवंत चंद्रपूर, डॉ. सुनील रामटेके सुप्रसिद्ध नाटककार व साहित्यिक मुंबई, डॉ. विजय शेगोकार विशेष कार्य अधिकारी मंत्रालय मुंबई, डॉ. विलास तायडे सुप्रसिद्ध साहित्यिक अकोला आणि बबिता डोळस सुप्रसिद्ध अभिनेत्री नागपूर हे मान्यवर उपस्थित होते.

### नागपूरची टँकर मुक्तीच्या दिशेने वाटचाल

**नागपूर :** नागपूर शहराला टँकरमुक्त करण्यासाठी महापालिकेतर्फे विविध पावले उचलली जात असून शहरातील धरमपेठ, नेहरूनगर, हुडकेश्वर-नरसाळा व मंगळवारी झोन टँकर मुक्त झाले आहेत. अमृत योजना 2 अंतर्गत जलवाहिन्या व फिडर लाईन टाकण्याची कामे येत्या मे महिन्यात पूर्णत्वास जाणार आहे. अमृत योजनेअंतर्गत नागपूर महापालिकेच्या कार्यक्षेत्रात राबविण्यात येत असलेल्या अधिकृत, अनधिकृत, झोपडपट्ट्यांमध्ये पाणी पुरवठा प्रणालीचे विस्तारीकरण व बळकटीकरण कामांचा समावेश आहे. या योजनेअंतर्गत 32 उंच जलकुंभाचे बांधकाम व 377 किलोमीटर लांबीची जलवाहिनी टाकण्याचे प्रस्तावित आहे. यापैकी 27 जलकुंभाचे काम पूर्ण झालेले आहे. जलवाहिन्या टाकण्याचे काम पूर्ण झाले आहे. या योजनेअंतर्गत डबलडेकर जलकुंभाच्या बांधकामाचा समावेश होता. देशात पहिल्यांदा डबल डेकर जलकुंभ कार्यान्वित केला आहे.

## निधन वार्ता

### ॲड. सुखदेव साखरे



**नागपूर :** रिपब्लिकन चळवळीचे व बहुजन समाजाला दिशा देण्याचे काम करण्याची तळमळ असणारे आंबेडकरवादी समाजसेवक ॲड. सुखदेव साखरे यांचे आज दुपारी दोन वाजता दुःखद निधन झाले. ते 87 वर्षांचे होते. त्यांच्यामागे मोठा आप्तपरिवार आहे. दि. 31/3/2025 सोमवारला नारा घाट, जरीपटका, नागपूर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.



## संजीवनी सखी संघाचा महिला मेळावा साजरा

**नागपूर :** संजीवनी सखी संघाच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून महिला मेळाव्याचे आयोजन डॉ. बाबासाहेब आंबेडकर सांस्कृतिक सभागृह (बानाई) ऊरुवेला कॉलनी येथे नुकतेच केले. संजीवनी सखी संघाच्या वाटचालीला अठरा वर्षे पूर्ण झाले. संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी समूहगीत सादर करून सुरुवात केली. संस्थेच्या ज्येष्ठ संस्थापक सदस्य व सल्लागार साधना मेश्राम, सरला बोरकर, जिजा टेम्भूर्णे, आर्कि. कल्पना मेश्राम (पूर्वाध्यक्ष) तसेच वर्तमान अध्यक्ष व संस्थापक विभा गजभिये यांना सन्मानित केले. विविध क्षेत्रात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या महिलांचासुद्धा सत्कार संस्थेतर्फे करण्यात आला. त्यामध्ये अर्चना खोब्रागडे (सरपंच व सामाजिक कार्यकर्ता), रश्मी लभाने (धम्म टीचर), अश्विनी लिल्लारे (समाजसेविका), किरण बागडे (ड्रेस डिझायनर फिल्म इंडस्ट्री), ममता गेडाम (उद्योजिका) यांचा समावेश होता. सर्व सत्कारमूर्तींनी आपला प्रेरणादायक प्रवास यावेळी कथन केला. संजीवनी सखी संघ भंडारा व कन्हान शहरात कार्यरत आहेत. या संस्थांच्या पदाधिकारी महिला मेळाव्यात आवर्जून हजर होत्या. त्यामध्ये संजीवनी सखी संघ, कन्हान अध्यक्ष दुर्गा नकोसे, भिलगावच्या रजनी खापर्डे व भंडारा संजीवनी सखी संघ अध्यक्ष निशा लोखंडे, हेमा गजभिये, शिल्पा चव्हाण व त्यांच्यासोबत असलेल्या पदाधिकाऱ्यांना सुद्धा सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी संस्थेच्या सदस्यांनी विविध महानायिकांच्या वेषभूषेत येऊन नाट्यछटेचे सादरीकरण केले व समूहगीते गाऊन मेळाव्यात रंगत आणली. संविधान तसेच महिला दिनावर आधारित प्रश्नावलीला सदस्यांकडून उत्तम प्रतिसाद मिळाला. या मेळाव्याला सदस्यांची भरगच्च उपस्थिती होती. याप्रसंगी घरगुती तयार केलेल्या वस्तुंचे व खाद्यपदार्थाचे विविध स्टॉल लावलेले होते. संचालन अनिता जनबादे, प्रास्ताविक वंदना देशभ्रतार व आभार प्रदर्शन कल्पना कांबळे यांनी केले. आयोजनामध्ये सुवर्णा डोंगरे, ममता डंभाले, कल्पना कांबळे व आर्कि. कल्पना मेश्राम यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी प्रयत्न केले आणि डॉ. सीमा अंबाडे, प्रतिभा रामटेके, पुष्पा रामटेके, चंदा सहारे, मृणालिनी दहिवाडे, मंगला गजभिये, सुजाता गजभिये, पद्मा भिवगडे, सुरेखा लोकरे, माधवी खोब्रागडे, अनिता पाटिल यांचे सहकार्य लाभले.

## मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेचा 47 वा वर्धापनदिन साजरा



**नागपूर :** महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटनेचा 47 वा वर्धापनदिन प्रेरणा आणि सामाजिक बांधिलकीच्या संकल्पाने मोठ्या उत्साहात संपन्न झाला. हा प्रेरणादायी सोहळा डॉ. बाबासाहेब आंबेडकर कामगार प्रशिक्षण केंद्र, प्रेरणा नगर, हजारी पहाड, नागपूर येथे संपन्न झाला. यावेळी संघटनेच्या इतिहासाचा गौरवपूर्ण पुनरुच्चार करण्यात आला आणि सामाजिक समतेच्या लढ्याचा दृढ संकल्प करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जे. एस. पाटील होते. प्रमुख उपस्थितांमध्ये संजय घोडके (केंद्रीय अध्यक्ष), प्रेमानंद मौर्य (सरचिटणीस), सूर्यकांत जनबंधू (मुख्य संघटक), दयानंद हाडके (केंद्रीय उपाध्यक्ष), संजय मोरे (कार्याध्यक्ष) आणि सेवानिवृत्त मुख्य अभियंता एस. टी. शिंदे आदी मान्यवर उपस्थित होते.

संघटनेसाठी बहुमोल योगदान दिलेल्या ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा या प्रसंगी विशेष सत्कार करण्यात आला. जे. एस. पाटील यांनी या ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा सविस्तर परिचय करून दिला आणि त्यांचा संघर्षमय प्रवास उलगडून सांगितला. सन्मानित कार्यकर्त्यांना शाल, पुस्तक, स्मृतिचिन्ह आणि पुष्पगुच्छ प्रदान करून गौरविले. यावेळी कार्यकर्त्यांनी आपल्या प्रेरणादायी अनुभवांचे कथन केले, संघटनेच्या ऐतिहासिक वाटचालीचा आढावा घेत भविष्यातील उद्दिष्टांवर विचारमंथन करण्यात आले. 'आम्ही फक्त कर्मचारी नाही, तर सामाजिक परिवर्तनाचे दूत आहोत,' असे केंद्रीय अध्यक्ष डॉ. संजय घोडके यांनी ठामपणे सांगितले. 'महाराष्ट्र राज्य मागासवर्गीय विद्युत कर्मचारी संघटना - हे सामाजिक क्रांतीचे हत्यार आहे!' या घोषवाक्यासह उपस्थितांनी सामाजिक न्याय आणि समतेच्या लढ्याचा नवा संकल्प केला. कार्यक्रमाचे संचालन सुशांत शृंगारे यांनी केले, तर दयानंद हाडके यांनी प्रास्ताविक केले.

नागपूर परिमंडळ, नागपूर शहर मंडळ आणि नागपूर ग्रामीण मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी अथक प्रयत्न घेत हा सोहळा यशस्वी केला.

## कृष्णा लील्लारे क्रीडारत्न पुरस्काराने सम्मानित



**संवाद मित्र प्रकाश बावनगडे, नागपूर :** सुगत बुद्ध विहार चॉक्स कॉलोनी, नागपूर येथील सभागृहात नुकतेच संपन्न झालेल्या 16व्या अखिल भारतीय आंबेडकरी साहित्य संमेलनात कृष्णा लील्लारे या युवकास क्रीडारत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. पुरस्काराचे स्वरूप रोख रक्कम, पंचशील दुपट्टा, स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र असे आहे. हा युवक विक्रांत स्पोर्टिंग अँड रिक्रेशन क्लब, नागपूरमधून रब्बी आणि कबड्डी या खेळात उत्कृष्टता प्राप्त केलेला खेळाडू आहे. साधारण कुटुंबातील या युवकाने वर्ष 2023-24 मध्ये आपल्या कर्तृत्वाने 19 वर्षाखालील गटात राज्य स्तरावर जिल्हा असोसिएशन संघात प्रवेश मिळविला. वर्ष 2024-25 मध्ये चंदिगढ येथे संपन्न कबड्डी या खेळासाठी अखिल भारतीय स्पर्धेसाठी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाकडून नामांकित केले गेले होते व संघात समावेश करण्यात आला होता. पश्चिम झोन चंद्रपूर येथे संपन्न झालेल्या कबड्डी या खेळासाठी संघात समावेश होता. अशा या होतकरू युवकाचा संमेलनाचे अध्यक्ष डॉ. प्रकाश मोगले, उद्घाटक डॉ. एम.एल. परिहार, स्वागताध्यक्ष डॉ. परमानंद बागडे, इ.मो. नारनवरे यांच्या हस्ते मुख्य आयोजक प्रा. प्रवीण कांबळे, सह आयोजक सुरेश वंजारी, कवयित्री दीपाली दीप, जगदीश राऊत, प्रकाश बावनगडे व इतर अनेक मान्यवरांच्या उपस्थितीत सत्कार केला.

## गोंदिया येथे महा अंनिसचे जादूटोणा विरोधी कायदा व चमत्कार प्रशिक्षण



**गोंदिया :** समता सैनिक दल व भारतीय बौद्ध महासभा यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तीन दिवसीय महिला व विद्यार्थी प्रशिक्षण शिबीरात महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती नागपूरद्वारे चमत्कार सादरीकरण व जादूटोणा विरोधी कायदाचे प्रशिक्षण देण्यात आले.

मैत्रेय बौद्ध विहार भीमनगर गोंदिया येथील प्रशस्त प्रांगणात आयोजित या शिबिराला गोंदिया जिल्ह्यातील ग्रामीण परिसरातून प्रशिक्षणासाठी विद्यार्थी व महिला तीन दिवसीय निवासी आल्या होत्या. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान समता सैनिक दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष डी. एफ. कोचे यांनी भुषविले होते, तर मंचकावर गजेंद्र गजभिये, राष्ट्रीय स्टाफ आफिसर स.सै.दल, आर. सी. फुल्लुके भंडारा जिल्हा ससैद, महाअंनिस गोंदिया शाखेचे प्रधान सचिव विनोद बनसोड व कार्याध्यक्ष अनिल गोंडाने, विराजमान होते. संविधानाच्या प्रास्ताविकेचे सामुहिक वाचन जिल्हा निधी संकलन कार्यवाह चंद्रशेखर मेश्राम यांनी केले व चळवळीचे गीत सादर करुन उत्तर नागपूरचे कार्याध्यक्ष देवानंद बडगे यांनी कार्यक्रमात रंगत आणली. राज्य कार्यकारिणी सदस्य रामभाऊ डोंगरे यांनी महा अंनिसचे कार्य व उद्देश काय हे प्रस्तावनेत सादर केले तर देवानंद बडगे यांना सोबत घेऊन चमत्काराचे विविध प्रयोग सादर केले.

त्यात पाण्याने दिवा जाळने, पैशाचा पाऊस पाडणे, दोरखंड कापुन जसे चे तसे जोडणे, लोखंडी लंगर सोडवीणे व मंत्राने हवन जाळणे ई. प्रमुख चमत्कार सादर करुन विद्यार्थी व महिलांना मंत्रमुग्ध केले. या प्रसंगी उपस्थित सर्व महिलांना अंधश्रद्धा निर्मूलन वार्तापत्राचा जागतिक महिला दिन विशेषांक भेट म्हणून देण्यात आला.

कार्यक्रमाचे संचालन नागपूर जिल्हा कार्याध्यक्ष चित्तरंजन चौरे यांनी तर आभार समता सैनिक दलाच्या म.प्र राज्याचे प्रमुख कुंवरलाल रामटेके यांनी मानले. शिबीराला गोंदिया ग्रामीण मधून रंजना वालदे, प्रेमलता राऊत, शिवमाला मडामे, तर शहरी प्रभागातून किरण वासनिक, ज्योती बोरकर, शशीकला वैद्य, चित्रा मेश्राम, वैशाली, वंदना चौरे, छाया मेश्राम, तक्षशिला गडपायले, संध्या रामटेके, केशर डहाट, शोभा वैद्य, लता वासनिक, सुनीता रंगारी, मंदा बनसोड, लक्ष्मी राऊत, अंशुल राऊत, स्वप्निल गणवीर, विलास राऊत, विद्यार्थी वर्ग व परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## रानगव्याने केली तब्बल एक एकराच्या धान रोवणीची नासधूस



**बाराभाटी :** जवळच्या बोळदे कवठा शिवारातील रब्बी धान रोवणी पिकांची रानगव्याने मोठ्या प्रमाणावर तब्बल एक एकराची नासधूस केली आहे. या जंगली प्राण्यांच्या प्रकाराने शेतकरी चिंताग्रस्त होवून फार वैतागून गेले आहेत. वनविभागाचे दुर्लक्ष आहे. खरीपानंतर रब्बी धान पिकांची परिसरात मोठ्या प्रमाणावर रोवणी करण्यात आली आहे. अशातच शेतकरी पाण्याचा योग्य वापर करून धान पिकांची लागवड झाली की भरघोस पीक यावे. यासाठी खूप मेहनत करून उत्तम शेती पिकवली जाते. गेल्या काही दिवसापासून जंगली प्राणी रानगवा या प्राण्यांनी कैलास येरणे यांच्या शेतातील फारच मोठ्या प्रमाणात धान पिक रोवणीची नुकसान केली आहे.

विभागाने नुकसान भरपाई द्यावी :- बोळदे कवठा शिवारातील शेती ही नवेगावबांध या वनपरिक्षेत्र भागात येत असून, रानगव्याने धान पिक रोवणीची नुकसान केल्यामुळे नवेगावबांध वनपरिक्षेत्र अधिकारी यांना माहिती दिली असता त्यांनी जंगली प्राण्यांसाठी काहीच करता येत नाही असे म्हणून टाळाटाळ केली आहे. या प्रकाराने शेतकरी हतबल झाले. पण भरपाई यावर काहीच न बोलता, पंचनामे अजूनही करण्यात आले नाही.

बहुजन सौरभ

वाचकांना आवाहन
आम्ही वाचतो, तुम्हीपण वाचा!



११ एप्रिल राष्ट्रपिता महात्मा ज्योतिराव फुले, १४ एप्रिल भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व ५ एप्रिल सम्राट अशोक
यांच्या संयुक्त जयंतीप्रित्यर्थ
आपल्या शुभेच्छा व जाहिराती खालील पत्यावर पाठवाव्यात.

जाहिरात दरपत्रक

| | | |
|---|---|---|
| पान एक | - पूर्ण पान | - ६० हजार रूपये |
| सप्तरंगीन | - अर्ध पान | - ३० हजार रूपये |
| | - पाव पान | - १५ हजार रूपये |
| अंतिम पान | - पूर्ण पान | - ५० हजार रूपये |
| सप्तरंगीन | - अर्ध पान | - २५ हजार रूपये |

शुभेच्छा जाहिरात २००० रु. पासून

:: दैनिक बहुजन सौरभ कार्यालय ::
१/२, स्वराज कॉलनी, अजनी पोलिस स्टेशनजवळ, वंजारीनगर, पाण्याच्या टाकीजवळ, मेडिकल कॉलेज मागे, तुकडोजी महाराज पुतळा मार्ग, नागपूर-४४००२४
मेल -bahujansaurabh@gmail.com
संपर्क - 7020149291, 9422860648, 9421588901

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648